# जवाहर नवोदय विद्यालय निवड चाचणी 2025

## जवाहर नवोदय विद्यालय बेलोरा, ता. घाटंजी, जि. यवतमाळ करीता

## वर्ग 6 मध्ये प्रवेशाची सुवर्ण संधी

जवाहर नवोदय विद्यालय निवड चाचणी 2025 करिता प्रवेशासाठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज सुरू असून अर्ज करण्याची शेवटची तारीख 16/09/2024 आहे. शैक्षणिक सत्र 2024–25 मध्ये वर्ग 5 मध्ये शिकत असलेले विद्यार्थी ऑन लाईन अर्ज करण्यास पात्र आहेत. ही निवड चाचणी शैक्षणिक सत्र 2025–26 वर्ग 6 मध्ये प्रवेशाकरिता आहे. अर्ज ऑन लाईन पध्दतीनेच भरायचे आहे. ही निवड चाचणी शनिवार दिनांक 18/01/2025 रोजी सकाळी 11.30 ते दुपारी 1.30 या कालावधीत होणार आहे. ऑन लाईन अर्ज भरण्यासाठी **https://navodaya.gov.in** आणि **www.jnvyavatmal.com** या संकेत स्थळाचा वापर करावा, अधिक माहितीसाठी संकेत स्थळ **https://navodaya.gov.in** किंवा प्राचार्य, जवाहर नवोदय विद्यालय, बेलोरा ता. घाटंजी जि. यवतमाळ (महा.) यांच्याशी संपर्क साधावा. या निवड चाचणी साठी अधिकाधिक ऑन लाईन अर्ज करावे असे आवाहन प्राचार्य, जवाहर नवोदय विद्यालय, बेलोरा ता. घाटंजी जि. यवतमाळ (महा.) करीत आहेत.

पात्रता :–

1. विद्यार्थी यवतमाळ जिल्हयातील रहिवासी असावा तसेच यवतमाळ जिल्हयातील शासकीय किंवा मान्यताप्राप्त शाळेत इयत्ता पाचवीत सन 2024–25 मध्ये शिकत असावा.
2. विद्यार्थ्याने सन 2022–23, 2023–24 व 2024–25 मध्ये सलग इयत्ता तिसरी, चौथी व पाचवी उत्तीर्ण केलेली असावी.
3. विद्यार्थ्याचा जन्म दि. 01/05/2013 पूर्वी व 31/07/2015 (दोन्ही दिवस धरून) नंतर झालेला नसावा.

आरक्षण :–

1.ग्रामीण उमेदवाराकरिता 75%जागा राखीव

2. 1/3 मुलींकरिता राखीव

3. इतर मागास वर्गीय, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि दिव्यांग उमेदवाराकरिता भारत सरकारच्या नियमानुसार जागा राखीव

ऑनलाईन अर्ज करण्याकरीता आवश्यक कागदपत्र :–

1.पाचवीत शिकत असलेल्या शाळांच्या मुख्याध्यापकांनी प्रमाणित केलेले प्रमाणपत्र 2. विद्यार्थ्याचा फोटो 3. पालकांची व विद्यार्थ्याची स्वाक्षरी 4. आधार माहिती तसेच सरकारी अधिका–यांनी प्रमाणित केलेले रहिवासी प्रमाणपत्र आदी तयार ठेवावे.

( के डी धोपटे )

प्राचार्य

प्रधानाचार्य / PRINCIPAL
पीएम श्री स्कूल / PM SHRI SCHOOL
जवाहर नवोदय विद्यालय,बेलोरा,तह.घाटंजी
JAWAHAR NAVODAYA VIDYALAYA,BELORA, Tal.-GHATANJI
जिला–यवतमाल (म.रा.) / DIST.YAVATMAL (M.S.)-445301.